Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME -
MH-33 -0714843

दैनिक
सत्याचे प्राईम्स
# जन सम्राट टाईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

।सोमवार, दि. २५ मे २०२६। वर्ष १ ।अंक ५० ।पाने २।
DIGITAL EDITION

भुसावळात शाळेबाहेरील वृक्षतोडीने संताप!
(पान २ वर)



Selected

## युवा शक्ती ही राष्ट्र शक्ती:अण्णा हजारे

पुणे/मुंबई । गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर प्रचंड चर्चेत असलेल्या 'कॉक्रोच जनता पार्टी' या व्यंगात्मक राजकीय चळवळीबाबत आता ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनीही महत्त्वपूर्ण प्रतिक्रिया दिली आहे. "युवा शक्ती ही राष्ट्र शक्ती आहे" असे सांगत अण्णा हजारे यांनी सरकारने तरुणांच्या भावना समजून घेत त्यांच्याकडे दुर्लक्ष करू नये, असा सल्ला दिला आहे. त्यांच्या या वक्तव्यानंतर 'कॉक्रोच जनता पार्टी'भोवती सुरू असलेल्या चर्चेला आणखी वेग आला आहे. देशभरातील तरुणांमध्ये मोठ्या प्रमाणात चर्चेत आलेली ही चळवळ सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर अवघ्या काही दिवसांतच लोकप्रिय ठरली. बेरोजगारी, शिक्षण, स्पर्धा परीक्षा, आर्थिक ताण आणि व्यवस्थेबद्दलचा वाढता असंतोष या मुद्द्यांवरून अनेक तरुण या व्यंगात्मक मोहिमेशी जोडले गेले आहेत.

### "मुंगेरीलाल के हसीन सपने..." म्हणत फडणवीसांचा टोला; लॉजिस्टिक पार्क उद्घाटनावेळी राजकीय शाब्दिक युद्ध

# 10 महिन्यांत मोदी सरकार कोसळणार?

## काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या दाव्यावर फडणवीसांचा पलटवार

**जन सम्राट टाईम्स**

**नागपूर । काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्रातील मोदी सरकार पुढील दहा महिन्यांत कोसळेल, असा दावा केल्यानंतर राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. राहुल गांधी यांच्या या वक्तव्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांनी शेलक्या शब्दांत प्रत्युत्तर देत जोरदार टोला लगावला आहे.**

नागपुरात आयोजित अत्याधुनिक गोदाम लॉजिस्टिक पार्कच्या उद्घाटन कार्यक्रमानंतर माध्यमांशी संवाद साधताना फडणवीस म्हणाले, "पूर्वी 'मुंगेरीलाल के हसीन सपने' ही मालिका यायची, राहुल गांधी यांच्या वक्तव्यातून त्याचाच प्रत्यय येतो." राहुल गांधी यांनी नुकत्याच झालेल्या काँग्रेसच्या बैठकीत केंद्र सरकारच्या स्थैर्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत मोदी सरकार फार काळ टिकणार नसल्याचा दावा केला होता. त्यांच्या या विधानानंतर भाजपकडून तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांनी राहुल गांधींच्या वक्तव्याला राजकीय वास्तवापासून दूर असल्याचे म्हणत अप्रत्यक्षपणे त्यांची खिल्ली उडवली. दरम्यान,



नागपुरात उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक लॉजिस्टिक पार्कच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस यांनी विदर्भाच्या औद्योगिक विकासावर भर देत नागपूरला देशातील प्रमुख लॉजिस्टिक हब बनवण्याच्या सरकारच्या धोरणाचा पुनरुच्चार केला. त्यांनी सांगितले की, "नागपूर हे आता देशातील महत्त्वाचे लॉजिस्टिक केंद्र म्हणून उदयास येत आहे. शंभर एकरांहून अधिक जागेवर उभारण्यात आलेले हे स्टेट ऑफ द आर्ट लॉजिस्टिक पार्क उद्योग, मॅन्युफॅक्चरिंग आणि वाहतूक क्षेत्रासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे." मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, राज्य सरकारने तयार केलेल्या लॉजिस्टिक पॉलिसीमुळे नागपूरमध्ये मोठ्या प्रमाणावर लॉजिस्टिक पार्क्स विकसित होत आहेत. यामुळे मालवाहतुकीचा खर्च कमी होईल आणि भारताला जागतिक सप्लाय चेनमध्ये अधिक प्रभावीपणे सहभागी होता येईल. "जर आपल्याला ग्लोबल सप्लाय चेनचा भाग व्हायचे असेल, तर लॉजिस्टिक कॉस्ट कमी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हेच काम आम्ही या माध्यमातून करत आहोत," असेही त्यांनी स्पष्ट केले. समृद्धी महामार्गाच्या विस्तारामुळे पूर्व विदर्भाच्या औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले. "समृद्धीचे एक्सटेन्शन आणि आधुनिक लॉजिस्टिक सुविधा यामुळे उद्योगांना वेग मिळेल. रोजगारनिर्मिती मोठ्या प्रमाणावर होईल. लॉजिस्टिक पार्कमध्ये सर्वाधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात आणि तरुणांना रोजगार मिळावा हा आमचा प्रमुख उद्देश आहे," असे फडणवीस यांनी सांगितले. दरम्यान, राहुल गांधी यांच्या वक्तव्यामुळे राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापले असून आगामी काळात भाजप आणि काँग्रेस यांच्यातील शाब्दिक संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. एकीकडे विरोधक केंद्र सरकारवर टीका करत असताना, दुसरीकडे भाजप विकासकामांच्या माध्यमातून जनतेसमोर आपली भूमिका अधिक ठामपणे मांडण्याचा प्रयत्न करत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

### शाब्दिक संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे

राहुल गांधींच्या वक्तव्याला राजकीय वास्तवापासून दूर असल्याचे म्हणत अप्रत्यक्षपणे त्यांची खिल्ली उडवलीलॉजिस्टिक पार्कच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस यांनी विदर्भाच्या औद्योगिक विकासावर भर देत नागपूरला देशातील प्रमुख लॉजिस्टिक हब बनवण्याच्या सरकारच्या धोरणाचा पुनरुच्चार केला. त्यांनी सांगितले की, "नागपूर हे आता देशातील महत्त्वाचे लॉजिस्टिक केंद्र म्हणून उदयास येत आहे. शंभर एकरांहून अधिक जागेवर उभारण्यात आलेले हे स्टेट ऑफ द आर्ट लॉजिस्टिक पार्क उद्योग, मॅन्युफॅक्चरिंग आणि वाहतूक क्षेत्रासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## खासदार स्मिताताई वाघ यांना 'संसद रत्न पुरस्कार !

### जळगावच्या शिरपेचात मानाचा तुरा

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव | प्रतिनिधी:** देशातील संसदेतील उत्कृष्ट, अभ्यासपूर्ण आणि प्रभावी कामगिरीबद्दल दिला जाणारा प्रतिष्ठेचा 'संसद रत्न पुरस्कार २०२६' जळगावच्या खासदार स्मिता वाघ यांना जाहीर झाला आहे. सलग दुसऱ्यांदा हा बहुमान मिळाल्याने जळगाव जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. संसदेतील सक्रिय सहभाग, लोकहिताच्या प्रश्नांवरील सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि प्रभावी मांडणीच्या जोरावर स्मिताताई वाघ यांनी राष्ट्रीय स्तरावर पुन्हा एकदा आपला ठसा उमटवला आहे. या घोषणेनंतर जळगाव जिल्ह्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. संसद रत्न पुरस्कार समितीच्या अध्यक्षा प्रियदर्शनी राहुल यांनी पुरस्कार विजेत्यांची घोषणा करताना सांगितले की, २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापर्यंत संसदेतील सदस्यांच्या कामगिरीचा सखोल अभ्यास करून ज्युरी समितीने विजेत्यांची निवड केली आहे. संसदीय कामकाजातील सहभाग, चर्चांमधील अभ्यासपूर्ण भूमिका, जनहिताच्या विषयांवरील सातत्यपूर्ण मांडणी आणि



उपस्थिती या निकषांच्या आधारे हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान केला जातो. खासदार स्मिता वाघ यांनी संसदेत विविध लोकहिताचे प्रश्न सातत्याने मांडत जळगाव जिल्ह्याच्या विकासाशी संबंधित विषय प्रभावीपणे उपस्थित केले आहेत. अभ्यासपूर्ण भूमिका आणि स्पष्ट मांडणीमुळे त्यांनी संसदेतील चर्चांमध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.


### विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव

संसदेतील सक्रिय सहभाग, लोकहिताच्या प्रश्नांवरील सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि प्रभावी मांडणीच्या जोरावर स्मिताताई वाघ यांनी राष्ट्रीय स्तरावर पुन्हा एकदा आपला ठसा उमटवला आहे. या घोषणेनंतर जळगाव जिल्ह्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## इबोला विषाणूचा वाढता धोका; महाराष्ट्राच्या शेजारील आंध्र प्रदेशात हायअलर्ट

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी:** आफ्रिकेतील काही देशांमध्ये इबोला विषाणूचा वाढता प्रादुर्भाव आणि त्यातून होत असलेल्या मृत्यूंच्या पार्श्वभूमीवर भारतातही सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या शेजारील आंध्र प्रदेश राज्यात आरोग्य विभागाने हायअलर्ट जारी करत विविध यंत्रणांना सज्ज राहण्याचे आदेश दिले आहेत. संभाव्य संसर्ग रोखण्यासाठी आंतरराष्ट्रीय विमानतळांवर प्रवाशांची तपासणी सुरू करण्यात आली असून, राज्यातील आरोग्य यंत्रणा पूर्णपणे सतर्क झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आफ्रिकेतील डेमॉक्रेटिक रिपब्लिक ऑफ काँगो, युगांडा आणि दक्षिण सुदान या देशांमध्ये इबोला विषाणूचे रुग्ण वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार आणि आंतरराष्ट्रीय आरोग्य संस्थांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आंध्र प्रदेश सरकारने प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू केल्या आहेत. विशेषतः परदेशातून येणाऱ्या




प्रवाशांवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. आंध्र प्रदेशचे आरोग्यमंत्री सत्यकुमार यादव यांनी दिलेल्या माहितीनुसार, विशाखापट्टणम, तिरुपती आणि विजयवाडा येथील आंतरराष्ट्रीय विमानतळांवर प्रवाशांच्या प्रवासाचा इतिहास तपासला जात असून त्यांचे आरोग्य परीक्षणही करण्यात येत आहे. विशेषतः आफ्रिकेतील बाधित देशांतून येणाऱ्या प्रवाशांवर अधिक लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. विमानतळ प्रशासन, जिल्हा आरोग्य विभाग आणि वैद्यकीय पथके यांच्यात सातत्याने समन्वय साधला जात आहे.

इबोलाची लक्षणे आढळणाऱ्या प्रवाशांना तातडीने क्वारंटाईन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संशयित रुग्णांच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींचीही वैद्यकीय तपासणी केली जाणार आहे. हवाई मार्गासोबतच विशाखापट्टणम बंदर आणि रस्तेमार्गाने राज्यात प्रवेश करणाऱ्यांवर देखील विशेष देखरेख ठेवण्यात येत आहे. कोरोना महामारीच्या काळातील अनुभव लक्षात घेऊन आंध्र प्रदेश आरोग्य विभागाने आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा अधिक मजबूत केली आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळ असलेल्या शहरांमधील शासकीय रुग्णालये आणि वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये विशेष आयसोलेशन वॉर्ड तयार ठेवण्यात आले आहेत. प्रत्येक ठिकाणी सुमारे १५ खाटांची सुविधा सज्ज ठेवण्यात आली असून आशा स्वयंसेविका आणि एएनएम कर्मचाऱ्यांना व्हर्च्युअल बैठकीद्वारे प्रशिक्षण देण्यात येत आहे. राज्यात पीपीई किट्स आणि विषाणू तपासणी किट्सचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची माहितीही आरोग्य विभागाने दिली आहे. नागरिकांमध्ये जनजागृती वाढवण्यासाठी स्थानिक प्रशासनालाही सूचना देण्यात आल्या आहेत.

## चिनावलहून दाम्पत्य बेपत्ता; परिसरात खळबळ!

### सावदा पोलिसांकडून शोधमोहीम सुरू; नागरिकांना सहकार्याचे आवाहन

**जन सम्राट टाईम्स**

**सावदा | प्रतिनिधी :** रावेर तालुक्यातील चिनावल येथील एक दाम्पत्य अचानक बेपत्ता झाल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणी सावदा पोलीस स्टेशनमध्ये मिसिंगची नोंद करण्यात आली असून पोलिसांनी शोधमोहीम वेगाने सुरू केली आहे. दरम्यान, संबंधित दाम्पत्यावर सावकारीच्या तणावाचा दबाव असल्याची चर्चा गावात रंगू लागली असली तरी पोलिसांनी याबाबत कोणतीही अधिकृत पुष्टी केलेली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, चिनावल येथील रहिवासी अनिल महारू नेमाडे (वय ५७) आणि त्यांची पत्नी भारती अनिल नेमाडे (वय ४६) हे दि. १६ मे २०२६ रोजी सकाळी सुमारे ७ वाजेच्या सुमारास कोणालाही काहीही न सांगता घरातून निघून गेले. त्यानंतर ते परत न आल्याने कुटुंबीयांनी शोध घेतला. मात्र, कुठेही माहिती न मिळाल्याने अखेर सावदा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. याप्रकरणी त्यांचा मुलगा टेकचंद अनिल नेमाडे (वय २४, रा. चिनावल) यांनी फिर्याद दिली असून सावदा पोलीस स्टेशनमध्ये मिसिंग रजिस्टर क्रमांक १३/२०२६ अन्वये नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हरविलेले अनिल नेमाडे हे निमगोरे वर्णाचे, अंदाजे ५ फूट ८ इंच उंच,



लांबट चेहरा, काळे-पांढरे केस, पुढील बाजूस टक्कल आणि जाड मिशी असलेले आहेत. त्यांचा उजवा हात अपघातामुळे कोपरापासून वाकलेला असून गळ्यात तुळशीमाळ आहे. तर भारती नेमाडे या अंदाजे ५ फूट ३ इंच उंच, गोल चेहरा, उंच नाक, काळे-पांढरे लांब केस, गळ्यात काळ्या मण्यांचे मंगळसूत्र तसेच स्थूल बांध्याच्या असल्याचे वर्णन पोलिसांनी दिले आहे. या घटनेमुळे चिनावल आणि परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. गावात दबक्या आवाजात सावकारीच्या आर्थिक तणावामुळे संबंधित दाम्पत्याने घर सोडल्याची चर्चा सुरू असली तरी पोलिसांकडून अधिकृतरीत्या कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. दरम्यान, पोलिसांनी सर्व शक्य त्या दिशांनी तपास सुरू केला असून नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. संबंधित दाम्पत्याबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास नागरिकांनी तात्काळ सावदा पोलीस स्टेशन किंवा तपासी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

## राहुल गांधींच्या नेतृत्वात पुन्हा देशव्यापी यात्रेची तयारी

### दीर्घकालीन आंदोलनाचा रोडमॅप

**जन सम्राट टाईम्स**

**धुळे| प्रतिनिधी :** पाच राज्यांच्या निवडणूक निकालांनंतर देशातील विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीने २०२९ च्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आपली राजकीय रणनीती अधिक आक्रमक करण्यास सुरुवात केली आहे. बदलते राजकीय वातावरण, जनतेच्या दैनंदिन आयुष्याशी संबंधित प्रश्न आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींचा विचार करून देशभरात जनआंदोलन उभारण्याची संधी असल्याचे विरोधी पक्षांना वाटत आहे.

याच पार्श्वभूमीवर आता काँग्रेससह इंडिया आघाडीतील प्रमुख पक्षांनी दीर्घकालीन आंदोलनात्मक भूमिका घेण्याचे संकेत दिले आहेत. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली 'भारत जोडो यात्रा'च्या धर्तीवर आणखी एक मोठी देशव्यापी यात्रा काढण्याची प्राथमिक रूपरेषा तयार करण्यात येत असल्याची माहिती समोर आली आहे. या यात्रेत इंडिया आघाडीतील इतर पक्षांनाही सहभागी करून घेण्याची रणनीती आखली जात आहे. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी उत्तर प्रदेशात अखिलेश यादव, महाराष्ट्रात उद्धव ठाकरे आणि बिहारमध्ये तेजस्वी यादव हे नेते आपापल्या राज्यांत स्वतंत्र जनसंवाद यात्रा काढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. काँग्रेस पुढील ३० महिने सातत्याने आंदोलनाच्या मोडमध्ये राहण्याच्या तयारीत असल्याचेही सांगितले जात आहे. इंडिया आघाडीतील नेत्यांमध्ये चार महत्त्वाच्या मुद्द्यांवर व्यापक सहमती झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. पहिला मुद्दा म्हणजे पुढील ३० महिने सातत्याने आंदोलनात्मक भूमिका कायम ठेवणे. दुसरा म्हणजे केवळ



भाजपविरोधी आघाडी म्हणून नव्हे, तर देशासमोर सक्षम पर्याय म्हणून स्वतःला सादर करणे. तिसरा मुद्दा म्हणजे बेरोजगारी, महागाई, शिक्षण आणि शेतकऱ्यांचे प्रश्न यांसारख्या जनतेवर थेट परिणाम करणाऱ्या मुद्द्यांना आंदोलनाचा केंद्रबिंदू बनवणे. तर चौथा मुद्दा म्हणजे भाजपकडून बदलत असलेल्या राजकीय समीकरणांना रोखत जातनिहाय जनगणनेच्या मुद्द्यावर निवडणुकीची लढाई अधिक तीव्र करण्यासाठीही तयारी सुरू केली .

### सरकारविरोधात वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न

दरम्यान काँग्रेसने जनआंदोलनाला डिजिटल माध्यमांतून अधिक प्रभावी करण्यासाठीही तयारी सुरू केली आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर कार्यकर्त्यांचे जाळे मजबूत करण्यावर भर दिला जाणार आहे. पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून व्हिडिओ आणि डिजिटल मोहिमा राबवण्यात येणार असून बेरोजगारी, पेपर लीक, वाढती महागाई आणि तरुणांच्या प्रश्नांना या मोहिमेत विशेष स्थान दिले जाणार आहे. आगामी काळात ऑनलाईन आणि ऑफलाईन या दोन्ही पातळ्यांवर सरकारविरोधात वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न काँग्रेसकडून केला जाणार आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## नीट घोटाळ्यात ट्विस्ट; शिवराज मोटेगांवकरचा 'तंत्र-मंत्र' व्हिडिओ व्हायरल

### विद्यार्थ्यांवर पाणी शिंपडत 'एम्सला लागणार'चा दावा; सोशल मीडियावर संतापाची लाट

**जन सम्राट टाईम्स**

**लातूर | प्रतिनिधी :** देशभरात गाजत असलेल्या नीट परीक्षा घोटाळ्याच्या तपासात दररोज नवनवीन धक्कादायक खुलासे समोर येत असताना आता या प्रकरणाला आणखी एक विचित्र आणि संतापजनक वळण मिळाले आहे. नीट घोटाळ्यातील आरोपी आणि लातूरमधील प्रसिद्ध आरसीसी क्लासेसचा संचालक शिवराज मोटेगांवकर याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला असून, त्यामध्ये तो विद्यार्थ्यांवर कथित तंत्र-मंत्र किंवा अंधश्रद्धेसारख्या प्रकारांचा वापर करताना दिसत आहे. या व्हिडिओमुळे शैक्षणिक क्षेत्रात मोठी खळबळ उडाली असून पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये सध्या सीबीआय कोठडीत असलेला शिवराज मोटेगावकर आपल्या क्लासमधील शेकडो विद्यार्थ्यांसमोर उभा असल्याचे दिसते. त्याच्या हातात तांब्याचे एक भांडे असून तो गवताच्या सहाय्याने त्यातील पाणी विद्यार्थ्यांवर शिंपडताना दिसत आहे. विशेष म्हणजे हे करताना तो विद्यार्थ्यांना "तुम्ही सगळे एम्सला लागणार" असे सांगत असल्याचे व्हिडिओत स्पष्ट ऐकू येत आहे. त्यामुळे या प्रकाराबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. हा व्हिडिओ समोर आल्यानंतर सोशल मीडियावर संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी




संबंधित अत्यंत महत्त्वाच्या परीक्षेच्या तयारीच्या नावाखाली अंधश्रद्धेला खतपाणी घातले जात होते का? विद्यार्थ्यांना मानसिकरीत्या प्रभावित करण्यासाठी अशा प्रकारांचा वापर केला जात होता का? असे सवाल नेटकऱ्यांकडून उपस्थित केले जात आहेत. दरम्यान, नीट परीक्षा घोटाळ्याच्या तपासात आधीच अनेक धक्कादायक बाबी समोर येत असताना या व्हिडिओमुळे तपास यंत्रणांचे लक्ष आता क्लासेसमधील इतर प्रकारांकडेही वळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विद्यार्थ्यांना डॉक्टर बनवण्याचे स्वप्न दाखवत त्यांच्या भावना आणि विश्वासाचा गैरफायदा घेतला गेला का, याबाबतही चर्चा सुरू झाली आहे.या प्रकरणामुळे लातूरसह राज्यातील कोचिंग क्लास संस्कृती पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे. स्पर्धा परीक्षांच्या वाढत्या दबावात विद्यार्थ्यांवर मानसिक ताण वाढत असताना काही संस्थांकडून अंधश्रद्धा आणि भावनिक प्रभावाचा वापर केला जात असल्याचे आरोप यापूर्वीही झाले होते. आता या व्हायरल व्हिडिओमुळे शिक्षण क्षेत्रातील नैतिकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, या प्रकरणी अधिकृत तपास सुरू असून संबंधित व्हिडिओची सत्यता आणि त्यामागील नेमका हेतू काय होता, याबाबत तपास यंत्रणा अधिक माहिती गोळा करत आहेत.

### राज्यातील कोचिंग क्लास संस्कृती पुन्हा एकदा

नीट परीक्षा घोटाळ्याच्या तपासात आधीच अनेक धक्कादायक बाबी समोर येत असताना या व्हिडिओमुळे तपास यंत्रणांचे लक्ष आता क्लासेसमधील इतर प्रकारांकडेही वळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विद्यार्थ्यांना डॉक्टर बनवण्याचे स्वप्न दाखवत त्यांच्या भावना आणि विश्वासाचा गैरफायदा घेतला गेला का, याबाबतही चर्चा सुरू झाली आहे.या प्रकरणामुळे लातूरसह राज्यातील कोचिंग क्लास संस्कृती पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे. स्पर्धा परीक्षांच्या वाढत्या दबावात विद्यार्थ्यांवर मानसिक ताण वाढत असताना काही संस्थांकडून अंधश्रद्धा आणि भावनिक प्रभावाचा वापर केला जात असल्याचे आरोप यापूर्वीही झाले होते.

» Selected

## कॉंक्रोच जनता पार्टीविषयी भाजपला भीती : आदित्य ठाकरे

नाशिक – शिवसेना (एकनाथ शिंदे) नेते डॉ. श्रीकांत शिंदे यांनी नाशिकमध्ये मागील आठवड्यात शिवसंवाद मेळावा घेत पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधल्यानंतर आता शिवसेना नेते आमदार आदित्य ठाकरे यांनीही नाशिकचा दौरा करुन कार्यकर्त्यांचा मेळावा घेतला. कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांना कोणकोणत्या समस्यांना हात घातला पाहिजे, प्रश्नांचा पाठपुरावा कसा केला पाहिजे, याविषयी मार्गदर्शन करतानाच पत्रकारांशी संवाद साधताना आदित्य ठाकरे यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या अपयशावर टीका केली. कुंभमेळ्यास कोणाचाही विरोध असण्याचे कारण नाही.त्याचा नाशिकला काही फायदा आहे काय, याचा विचार करण्याची गरज आहे. नाशिकमध्ये सर्वत्र खोदकाम करुन ठेवल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. पावसाळा सुरु झाल्यानंतर ही कामे यशस्वी होतील का, याची खात्री सरकार देणार आहे काय, असा प्रश्न आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला.

# पारोळा शहराच्या सुरक्षेला मिळणार बळ!

## पारोळा नगरपालिकेला आधुनिक अग्निशमन गाडीची भेट

जन सम्राट टाईम्स



**पारोळा | प्रतिनिधी:** शहराच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणारी नवीन अद्यावत अग्निशमन गाडी (फायर फायटर) शासनाकडून पारोळा नगरपालिकेला प्राप्त झाली असून, लोकप्रिय आमदार अमोल पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही गाडी मंजूर करण्यात आल्याचे सांगण्यात आले. वाढती लोकसंख्या, विस्तारत चाललेला नागरी परिसर आणि आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत पोहोचविण्याची आवश्यकता लक्षात घेता ही अग्निशमन गाडी पारोळा शहरासाठी मोठा दिलासा मानली जात आहे. आग लागणे, शॉर्टसर्किट, अपघात तसेच इतर आपत्कालीन घटनांमध्ये त्वरित प्रतिसाद देण्यासाठी अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असलेली ही अग्निशमन गाडी महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. यामुळे पारोळा नगरपालिकेच्या अग्निशमन विभागाची कार्यक्षमता वाढण्यास मदत होणार असून नागरिकांच्या सुरक्षेला अधिक बळ मिळणार आहे. शहरासाठी अद्ययावत अग्निशमन वाहनाची आवश्यकता अनेक दिवसांपासून व्यक्त केली जात होती. नागरिक, सामाजिक संघटना तसेच लोकप्रतिनिधींकडून वारंवार मागणी होत असताना अखेर या प्रयत्नांना यश मिळाले आहे. त्यामुळे शहरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. दरम्यान, नवीन अग्निशमन गाडीचे लोकार्पण व पूजन समारंभ आमदार अमोलदादा पाटील यांच्या संपर्क कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. आमदार अमोलदादा पाटील यांच्या हस्ते या वाहनाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी लोकनियुक्त नगराध्यक्ष चंद्रकांतदादा पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली. समारंभात विविध मान्यवर, नगरपालिकेचे पदाधिकारी, पत्रकार तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवसेना शहरप्रमुख तथा गटनेते अमृतभाऊ चौधरी, उपजिल्हाप्रमुख मनिषभाऊ पाटील, ज्येष्ठ पत्रकार बाळासाहेब पाटील, भूपेंद्र मराठे, विश्वास चौधरी, अभय पाटील, माजी उपनगराध्यक्ष सुदामबापू चौधरी, शिवसेना प्रतोद नितीन सोनार, नगरसेवक राजूभाऊ कासार, मनोजभाऊ जगदाळे, प्रमोदशेठ कासार, राजूबापू पाटील, पंकज मराठे, नजीरखान बेलदार, इमरान शेख, गोपालशेठ दाणेज, विनोदभाऊ पाटील, संदेश शिरोळे, भूषण टिपरे, बांधकाम व्यावसायिक पी. आर. वाणी, पत्रकार प्रकाश पाटील यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी शहराच्या सुरक्षेसाठी ही गाडी अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे मत व्यक्त केले. भविष्यात आग, अपघात किंवा अन्य आपत्कालीन घटनांमध्ये अधिक वेगाने आणि प्रभावीपणे मदतकार्य राबविणे शक्य होणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. नवीन अग्निशमन गाडी शहराच्या सेवेत दाखल झाल्यामुळे पारोळा नगरपालिकेच्या आपत्कालीन यंत्रणेला मोठे बळ मिळाले असून नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

### अग्निशमन गाडी महत्त्वाची भूमिका बजावणार

वाढती लोकसंख्या, विस्तारत चाललेला नागरी परिसर आणि आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत पोहोचविण्याची आवश्यकता लक्षात घेता ही अग्निशमन गाडी पारोळा शहरासाठी मोठा दिलासा मानली जात आहे. आग लागणे, शॉर्टसर्किट, अपघात तसेच इतर आपत्कालीन घटनांमध्ये त्वरित प्रतिसाद देण्यासाठी अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असलेली ही अग्निशमन गाडी महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. यामुळे पारोळा नगरपालिकेच्या अग्निशमन विभागाची कार्यक्षमता वाढण्यास मदत होणार असून नागरिकांच्या सुरक्षेला अधिक बळ मिळणार आहे.

जन सम्राट टाईम्स — विशेष बातमी

# भुसावळात शाळेबाहेरील वृक्षतोडीने संताप!

## तीन मोठ्या वृक्षांची कत्तल

जन सम्राट टाईम्स



**भुसावळ । प्रतिनिधी :** भुसावळ शहरात पर्यावरण संवर्धनाचे संदेश दिले जात असतानाच भरदिवसा तीन मोठ्या वृक्षांची विनापरवाना तोड करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आदर्श शाळेबाहेरील या वृक्षतोडीमुळे पर्यावरणप्रेमी, स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. शहरातील आदर्श शाळेबाहेर मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड सुरू असल्याचे काही सजग नागरिकांच्या निदर्शनास आले. यानंतर नागरिकांनी तात्काळ 'पर्यावरण संवर्धन व विकास समिती'चे जिल्हाध्यक्ष देवेंद्र वराडे तथा अप्पा आणि तालुकाध्यक्ष पवन नाले यांना माहिती दिली. माहिती मिळताच समितीचे पदाधिकारी घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी संपूर्ण प्रकाराची पाहणी केली. घटनास्थळी पोहोचल्यानंतर तीन मोठ्या वृक्षांची कत्तल करण्यात आल्याचे स्पष्ट झाल्याने पर्यावरणप्रेमींनी तीव्र नाराजी व्यक्त केली. या प्रकरणाची गंभीर दखल घेत समितीच्या पदाधिकाऱ्यांनी तात्काळ नगरपालिका प्रशासनाशी संपर्क साधला. नगरपालिका अधिकारी धनराज बाविस्कर यांना "आदर्श शाळेला वृक्षतोडीसाठी कोणती परवानगी देण्यात आली आहे का?" असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर बाविस्कर यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, नगरपालिकेकडून कोणालाही वृक्षतोडीसाठी कोणतीही परवानगी देण्यात आलेली नाही. नगरपालिकेची परवानगी नसताना भरदिवसा ही वृक्षतोड नेमकी कोणाच्या आशीर्वादाने करण्यात आली, असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. पर्यावरण संवर्धन व विकास समितीचे जिल्हाध्यक्ष देवेंद्र वराडे, तालुकाध्यक्ष पवन नाले तसेच इतर पर्यावरणप्रेमींनी या घटनेमागील जबाबदार व्यक्तींवर तातडीने गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या वृक्षतोडीमुळे शहराच्या हरित पट्ट्यावर मोठा परिणाम झाला असून पर्यावरणाचे अपरिमित नुकसान झाल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. वाढते तापमान, प्रदूषण आणि पर्यावरणीय असंतुलनाच्या पार्श्वभूमीवर झाडांचे संवर्धन आवश्यक असताना अशा प्रकारे बेकायदेशीर वृक्षतोड होणे अत्यंत गंभीर असल्याचे मत पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केले. दरम्यान, संबंधितांवर त्वरित कारवाई झाली नाही तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा पर्यावरण संवर्धन व विकास समितीकडून देण्यात आला आहे.

### कोणाच्या आशीर्वादाने करण्यात आली वृक्षतोड

नगरपालिका अधिकारी धनराज बाविस्कर यांना "आदर्श शाळेला वृक्षतोडीसाठी कोणती परवानगी देण्यात आली आहे का?" असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर बाविस्कर यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, नगरपालिकेकडून कोणालाही वृक्षतोडीसाठी कोणतीही परवानगी देण्यात आलेली नाही. नगरपालिकेची परवानगी नसताना भरदिवसा ही वृक्षतोड नेमकी कोणाच्या आशीर्वादाने करण्यात आली, असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# कारमधून गायींची तस्करी उघड!

## संतप्त जमावाने दोघांना पकडले

जन सम्राट टाईम्स



**धुळे | प्रतिनिधी :** धुळे शहरातील स्टेशन रोड परिसरात कारमधून गायींची तस्करी होत असल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर संतप्त नागरिकांनी दोन संशयितांना पकडून चोप दिल्याची घटना घडली. यावेळी जमावाने वाहनाची तोडफोड करत कारमध्ये कोंबून ठेवलेल्या दोन गायींची सुटका केली. घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मिळालेल्या माहितीनुसार, दुपारच्या सुमारास स्टेशन रोड परिसरातून जाणाऱ्या एका चारचाकी वाहनाच्या दरवाजातून गायीचा पाय बाहेर दिसल्याने काही नागरिकांना संशय आला. त्यानंतर नागरिकांनी संबंधित वाहनाचा पाठलाग केला. पाठलागादरम्यान वाहन थांबवून तपासणी केली असता कारमध्ये दोन गायी कोंबून नेल्या जात असल्याचे समोर आले. ही बाब लक्षात येताच परिसरातील नागरिक संतप्त झाले. जमावाने वाहनातील दोघांना बाहेर काढून मारहाण केली तसेच वाहनाची तोडफोड केली. यावेळी कारमध्ये अडकवून ठेवलेल्या दोन गायींची सुटका करण्यात आली. घटनेची माहिती मिळताच अनुप अग्रवाल यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. परिस्थिती अधिक चिघळू नये यासाठी त्यांनी नागरिकांना शांत राहण्याचे आवाहन केले. त्यांच्या हस्तक्षेपामुळे मोठा अनर्थ टळल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. यानंतर पोलिसांना घटनास्थळी पाचारण करण्यात आले. पोलिसांनी दोन्ही संशयितांना ताब्यात घेत पुढील चौकशी सुरू केली आहे. घटनेनंतर परिसरात मोठ्या प्रमाणावर नागरिकांची गर्दी झाली होती. दरम्यान, धुळे जिल्ह्यासह राज्यात गायींच्या तस्करीच्या घटना वारंवार समोर येत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. राज्यात गौहत्या बंदी कायदा अस्तित्वात असतानाही अशा घटना घडत असल्याने तस्करांना नेमके कोणाचे पाठबळ आहे, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात येत आहे.

### मोठ्या प्रमाणावर नागरिकांची गर्दी

कारमध्ये अडकवून ठेवलेल्या दोन गायींची सुटका करण्यात आली. घटनेची माहिती मिळताच अनुप अग्रवाल यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. परिस्थिती अधिक चिघळू नये यासाठी त्यांनी नागरिकांना शांत राहण्याचे आवाहन केले. त्यांच्या हस्तक्षेपामुळे मोठा अनर्थ टळल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. यानंतर पोलिसांना घटनास्थळी पाचारण करण्यात आले. पोलिसांनी दोन्ही संशयितांना ताब्यात घेत पुढील चौकशी सुरू केली आहे. घटनेनंतर परिसरात मोठ्या प्रमाणावर नागरिकांची गर्दी झाली होती.

# टिटवाळ्यात घरगुती वादाचे भीषण रूप; पत्नीची निर्घृण हत्या!

**आरोपी पतीला फाशीची शिक्षा देण्याची वडिलांची मागणी**

जन सम्राट टाईम्स



**टिटवाळा :** घरगुती वादातून एका विवाहित महिलेची निर्घृण हत्या झाल्याची धक्कादायक घटना टिटवाळ्यातील बल्याणी परिसरात उघडकीस आली असून, या घटनेमुळे संपूर्ण परिसर हादरला आहे. पत्नीला अमानुष मारहाण करून तिचा जीव घेतल्याचा आरोप पतीवर करण्यात आला असून, आरोपीविरोधात कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी पतीचे नाव सतीश काळूराम वाघे असून मृत महिलेचे नाव सारिका उर्फ रुखसार असे आहे. काही दिवसांपासून रुखसार आपल्या माहेरी राहत होती. आरोपी सतीश याने गोड बोलून तिला पुन्हा घरी बोलावल्याचे सांगितले जात आहे. मात्र घरी आल्यानंतर दोघांमध्ये पुन्हा जोरदार वाद झाला. या वादाचे रूपांतर थेट हिंसाचारात झाले. संतापाच्या भरात आरोपीने पत्नीला बेदम मारहाण केली. पाण्याने भरलेला हंडा तिच्या डोक्यात मारल्याचा तसेच तिचे डोके भिंतीवर आपटून अमानुष अत्याचार केल्याचा गंभीर आरोप मृत महिलेच्या वडिलांनी केला आहे. या मारहाणीत रुखसार गंभीर जखमी झाली. जखमी अवस्थेत तिला तातडीने स्थानिक महागणपती हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, तेथे ऑक्सिजनची सुविधा उपलब्ध नसल्याचे सांगून तिला अन्यत्र हलविण्याचा सल्ला देण्यात आल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. मृत महिलेचे वडील सुलतान अकबर अन्सारी यांनी आरोपी पतीविरोधात पोलिसांत तक्रार दाखल केली असून, आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली आहे. तसेच या प्रकरणात पोलिसांनी अपेक्षित सहकार्य केले नसल्याचाही गंभीर आरोप त्यांनी केला आहे. दरम्यान, या घटनेमुळे टिटवाळा परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. आरोपीवर कठोर कारवाई करून पीडित कुटुंबाला न्याय द्यावा, अशी मागणी नागरिक आणि सामाजिक संघटनांकडून करण्यात येत आहे.

# चावलखेडा रेल्वे रूळाजवळ बेवारस मृतदेह आढळला!

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव | प्रतिनिधी :** तालुक्यातील चावलखेडा रेल्वे रूळाजवळ एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. संबंधित व्यक्तीचा मृत्यू रेल्वे अपघातात झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत असून, मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नसल्याने धरणगाव पोलिसांनी नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शनिवार (दि. २३) रोजी चावलखेडा रेल्वे रुळाजवळील खांबा क्रमांक २८४/२२-२४ परिसरात एक अनोळखी पुरुष मृतावस्थेत आढळून आला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून पुढील प्रक्रिया सुरू केली. याप्रकरणी धरणगाव पोलीस स्टेशनमध्ये मृ.र.क्र. ३१/२०२६ अन्वये बी.एन.एस.एस. कलम १९४ प्रमाणे नोंद करण्यात आली आहे. मृत व्यक्तीचे वय अंदाजे ३० ते ४० वर्षे असल्याचे सांगण्यात आले आहे.तसेच मृत व्यक्तीने अंगात पांढऱ्या व फिकट आकाशी रंगाचा शर्ट आणि काळ्या रंगाची फुल पॅन्ट परिधान केली होती. संबंधित व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नसल्याने नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. परिसरातील तसेच इतर भागातील एखादी व्यक्ती बेपत्ता असल्यास किंवा या वर्णनाशी साधर्म्य असलेल्या व्यक्तीबाबत माहिती असल्यास नागरिकांनी तात्काळ धरणगाव पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस निरीक्षक सुनील पवार तसेच तपासी अंमलदार पोलीस नाईक जितेंद्र भालचंद्र भदाणे यांनी केले आहे. मृत व्यक्तीची ओळख पटल्यास त्याच्या कुटुंबीयांपर्यंत माहिती पोहोचण्यास मदत होणार असून, नागरिकांनी सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून पुढाकार घ्यावा, असेही पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

# महाविकास आघाडीचे चक्काजाम आंदोलन

## महागाई, इंधन दरवाढ आणि बेरोजगारीविरोधात केंद्र सरकारचा निषेध

जन सम्राट टाईम्स



**वरणगाव | प्रतिनिधी:** भुसावळ तालुक्यातील वरणगाव शहरात महाविकास आघाडीच्या वतीने शुक्रवारी केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात चक्काजाम आंदोलन करण्यात आले. वाढती महागाई, पेट्रोल-डिझेलची कृत्रिम टंचाई, बेरोजगारी आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे होत असलेल्या दुर्लक्षाच्या निषेधार्थ आंदोलनकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत सरकारविरोधात संताप व्यक्त केला. शहरातील तिरंगा सर्कल परिसरात हे आंदोलन पार पडले. महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते. हातात विविध मागण्यांचे फलक घेऊन आंदोलनकर्त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारविरोधात घोषणाबाजी केली. वाढत्या इंधन दरांमुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक गणित कोलमडले असून, महागाईमुळे घरगुती खर्च मोठ्या प्रमाणावर वाढल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. आंदोलनकर्त्यांनी पेट्रोल आणि डिझेलची कृत्रिम टंचाई निर्माण करून नागरिकांना जाणूनबुजून त्रास दिला जात असल्याचा आरोप केंद्र सरकारवर केला. दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किंमतींमुळे सामान्य नागरिकांचे जगणे कठीण झाले असून बेरोजगारीच्या प्रश्नावर सरकार पूर्णपणे अपयशी ठरत असल्याची टीकाही यावेळी करण्यात आली. शेतकरी वर्गाच्या समस्यांकडे सरकार दुर्लक्ष करत असल्याचा मुद्दाही आंदोलनात ठळकपणे मांडण्यात आला. कृषी उत्पादनांना योग्य भाव मिळत नसताना उत्पादन खर्च सातत्याने वाढत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला असल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. चक्काजाम आंदोलनामुळे तिरंगा सर्कल परिसरात काही काळ वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने नागरिकांना गैरसोयींचा सामना करावा लागला. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिसांनी घटनास्थळी कडक बंदोबस्त ठेवला होता. यावेळी प्रतिभा तावडे, मनोज देशमुख आणि जवरे सर यांनी माध्यमांशी संवाद साधत सरकारने महागाई, बेरोजगारी आणि शेतकरी प्रश्नांवर तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली.

### नागरिकांना गैरसोयींचा सामना करावा लागला

कृषी उत्पादनांना योग्य भाव मिळत नसताना उत्पादन खर्च सातत्याने वाढत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला असल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. चक्काजाम आंदोलनामुळे तिरंगा सर्कल परिसरात काही काळ वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने नागरिकांना गैरसोयींचा सामना करावा लागला. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिसांनी घटनास्थळी कडक बंदोबस्त ठेवला होता.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# धुळ्यात 19 वर्षांखालील फिफ्टी बॉल क्रिकेट प्रीमियर लीगला सुरुवात

## सुभाष भामरे यांच्या हस्ते उद्घाटन; राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंचा सत्कार

जन सम्राट टाईम्स



**धुळे । | प्रतिनिधी :** ५० बॉल्स क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र यांच्या मान्यतेने धुळे जिल्हा फिफ्टी बॉल क्रिकेट असोसिएशन, शिवस्वराज्य प्रतिष्ठान महाराष्ट्र आणि साई बालाजी सांस्कृतिक क्रीडा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या १९ वर्षांखालील फिफ्टी बॉल क्रिकेट प्रीमियर लीग स्पर्धेला उत्साहात सुरुवात झाली. ही स्पर्धा चावरा इंग्लिश मिडीयम स्कूलच्या पटांगणात २३ मे ते २६ मे २०२६ दरम्यान रंगणार आहे. स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी संरक्षण राज्यमंत्री सुभाष भामरे उपस्थित होते. त्यांच्या हस्ते टॉस करून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटनानंतर उपस्थित खेळाडू आणि क्रिकेटप्रेमींना संबोधित करताना त्यांनी युवकांना जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावर पोहोचण्याचे आवाहन केले. यावेळी बोलताना सुभाष भामरे म्हणाले की, ग्रामीण आणि शहर भागात अशा प्रकारच्या क्रीडा स्पर्धांचे सातत्याने आयोजन होणे आवश्यक आहे. क्रीडेमुळे तरुणांमध्ये आत्मविश्वास वाढतो, शिस्त निर्माण होते आणि सकारात्मक ऊर्जा मिळते. योग्य प्रशिक्षण आणि संधी मिळाल्यास येथील खेळाडू राष्ट्रीय स्तरावरही चमक दाखवू शकतात, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमात ५० बॉल क्रिकेट राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या क्रिकेटपटू ओम राणा, निखिल चौबे, गीत सोनवणे आणि राज करनकाळ यांचा सुभाष भामरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी खेळाडूंचे टाळ्यांच्या गजरात अभिनंदन केले. या उद्घाटन समारंभाला सामाजिक कार्यकर्ते शिवाजी भांबरे, युवा नेते विनोद जगताप, सामाजिक कार्यकर्ते लखन चांगरे, चावरा इंग्लिश मिडीयम स्कूलचे व्हाईस प्रिन्सिपल फादर ॲलेक्स, डॉ. जितेंद्र घुमरे, माजी राज्यस्तरीय क्रिकेटपटू महेश गायकवाड तसेच टेनिस क्रिकेट असोसिएशनचे सचिव संदीप शिंदे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्पर्धेमुळे धुळे शहरातील क्रिकेटप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, आगामी काही दिवस क्रिकेटच्या रोमांचक सामन्यांनी

### या मान्यवरांची होती कार्यक्रमाला उपस्थिती

ओम राणा, निखिल चौबे, गीत सोनवणे आणि राज करनकाळ यांचा सुभाष भामरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी खेळाडूंचे टाळ्यांच्या गजरात अभिनंदन केले. या उद्घाटन समारंभाला सामाजिक कार्यकर्ते शिवाजी भांबरे, युवा नेते विनोद जगताप, सामाजिक कार्यकर्ते लखन चांगरे, चावरा इंग्लिश मिडीयम स्कूलचे व्हाईस प्रिन्सिपल फादर ॲलेक्स, डॉ. जितेंद्र घुमरे, माजी राज्यस्तरीय क्रिकेटपटू महेश गायकवाड तसेच टेनिस क्रिकेट असोसिएशनचे सचिव संदीप शिंदे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एरंडोलच्या भाविकांच्या कारला भीषण अपघात

जन सम्राट टाईम्स

**एरंडोल | प्रतिनिधी :** सप्तश्रृंगी गडावरील देवीचे दर्शन आटोपून त्र्यंबकेश्वरकडे निघालेल्या एरंडोल येथील एकाच कुटुंबातील भाविकांच्या कारला नाशिकजवळ भीषण अपघात झाला.

म्हसरूळ परिसरात झालेल्या या दुर्दैवी अपघातात ७२ वर्षीय वृद्ध महिलेचा जागीच मृत्यू झाला असून दोन महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. या घटनेमुळे एरंडोल परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मृत महिलेचे नाव कमळाबाई रामदास सूर्यवंशी (वय ७२) असे असून त्या एरंडोल तालुक्यातील रहिवासी होत्या. त्र्यंबकेश्वरकडे रवाना झाले होते. दरम्यान, सकाळी सुमारे १० वाजेच्या सुमारास कार नाशिकमधील म्हसरूळ परिसरात पोहोचली असता अचानक चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. भरधाव वेगातील कार थेट रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर जाऊन जोरात आदळली. अपघात इतका भीषण होता की कारच्या पुढील भागाचा अक्षरशः चक्काचूर झाला. या भीषण धडकेत कमळाबाई सूर्यवंशी यांना गंभीर दुखापत झाली आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. तर वैशाली उमेश धुमावकर (वय ३३) आणि शोभाबाई धोंडू विश्वे (वय ५४) या दोन महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. त्यांच्यावर नाशिकमधील स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती मिळाली आहे.